**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. २१/२०१६-१७/१८२ दिनांक:०८.११.२०१६

**आदेश**

**आदेश केस क्र. २१/२०१६-२०१७**

| | |
|---|---|
| १) मे.तुळशी कास्टीग ॲन्ड मशिनिंग लि., पूर्वीचे नाव तुळशी फौन्ड्रीज लि., मु.पो. कुपवाड जि. सांगली | **तक्रार अर्जदार (ग्राहक)** |
| **विरुध्द** | |
| २) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय, सांगली | **विरुध्द पक्षकार** |
| ३) कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, शहर विभाग सांगली | |
| ४) अतिरिक्त कार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, माधवनगर सांगली | |

**कोरमः-** १.श्री वि.श. गुळवणी, अध्यक्ष
२.श्री. प्र.वि. खपली, सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. बुरांडे, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

**न्याय निर्णय**

मी वि.श. गुळवणी अध्यक्ष, ग्राहक तक्रार,निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय जाहिर करीत आहे.

१) मे. तुळशी कास्टींग ॲड मशिनिंग लि. ज्यांचे पूर्वीचे नांव मे. तुळशी फौड्रीज लि. कुपवाड, सांगली असे होते आणि ज्यांचा औद्योगिक ग्राहक क्र. २७९२४९००५२८० असा होता, त्यांनी प्रस्तुत प्रकरण दिनांक ०८-०९-२०१६ रोजी या मंचाकडे दाखल केले आहे. त्यांच्या १८ पानी गा-हाणे अर्जातील सविस्तर मजकूराचा सारांश या पुढील परिच्छेद क्र.२ ते ५ मध्ये नमूद करणेत येतो.

२) तक्रारदार यांना त्यांच्या दिनांक २७-१२-२००४ च्या अर्जानुसार आणि तत्कालीन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (संक्षिप्तपणे MSEB) यांनी दिलेल्या दिनांक १८-०२-२००५ च्या मंजूरीनुसार रक्कम रु. ४०,७७,९४०/- भरुन घेऊन आणि जरुर ते करारपत्र झालेनंतर उपरोक्त ग्राहक क्रमांकाची नविन वीज जोडणी दिनांक २२-०३-२००५ रोजी देणेत आली. सदर प्रमाणे वीज पुरवठा प्लॉट क्र. ई-२ एम.आय.डी.सी. कुपवाड, सांगली या जागेत देणेत आला. त्यानंतर फेब्रुवारी २०१० मध्ये १०००० के.व्ही. वाढीव विद्युत भारास मंजूरी देणेत आली. तक्रारदार यांनी वि.प.कडे दिनांक २४-०२-२००५ रोजी रु. १९,७२,८००/- आणि वाढीव रक्कम रु. १८,६४,३००/- दिनांक २९-०५-२००७ रोजी अनामत म्हणून भरलेल्या होत्या. दरम्यान २००९-२०१०मध्ये तक्रारदार यांचे मे. तुळशी फौन्ट्रीज लि. हे नाव बदलून मे तुळशी कास्टींग ॲन्ड मशिनिंग लि. असे नोंद करणेत आले. त्यानंतर पुढे दिनांक ०५-१०-२०१५ च्या तक्रारदार यांच्या अर्जानुसार त्यांचा वीज पुरवठा वि.प. यांना दिनांक २७-१०-२०१५ रोजी कायम स्वरुपी बंद केला तेव्हा तक्रारदार यांचेकडून वि.प. यांनी काहीही रक्क म देय नव्हती. त्यानंतर, तक्रारदार यांनी दिनांक २२-०१-२०१६ रोजी, त्यांनी MSEB कडे भरलेली अनामत व क्रेडीट असणारी रक्कम परत मिळणेसाठी अर्ज केला, परंतु अर्ज 'अनामत रक्कम आणि बॅलन्स रक्कम सध्या परत करता येणार नाही.' असे नमूद करुन दिनांक २४-०२-२०१६ रोजी फेटाळणेत आला. त्यात कारणे नमूद करणेत आली.

३) तक्रारदार पुढे कथन करतात की, सदर प्लॉट क्र. ई-२ एम.आय.डी.सी. यामध्ये तक्रारदार यांचे अगोदर मे. कुलकर्णी इंजिनियरिंग असोसिएटस प्रा. लि. चा जो ऊद्योग चालू होता तो दिनांक १८-०३-२००३ रोजी वीज थकबाकी न भरल्यामुळे दिनांक १८-०३-२००३ रोजी वीज जोडणी कायमपणे तोडल्याने बंद झाला होता. वि.प. यांच्या म्हणण्याप्रमाणे तक्रारदार यांनी महावितरण यांना मे. कुलकर्णी इंजिनियरिंग यांच्या थकबाकीबद्दल हमीपत्र (Undrtaking) दिले होते. वास्तविक असे कोणतेही अंडरटेकींग तक्रारदार यानी महावितरण कंपनीस दिले नव्हते. तक्रारदार यांनी दिनांक ०७-०१-२००५ रोजी MSEB यांना मे. कुलकर्णी यांची कायमची बंद केलेली वीज जोडणी पुन्हा तक्रारदार यांचेसाठी सुरु करण्यास म्हणजे रिकनेक्शनसाठी अंडरटेकींग दिले होते. तथापि, तक्रारदार यांनी रिकनेक्शन न घेता स्वतंत्रपणे वेगळा अर्ज देऊन नविनच कनेक्शन घेतले होते. वास्तविक मे. कुलकर्णी यांची वीज जोडणी मार्च-२००३ मध्ये कायमपणे बंद झालेनंतर तक्रारदार यांनी सिकॉम यांचेकडून लिलावामध्ये प्लॉट क्र.ई-२ डिसेंबर २००४ मध्ये खरेदी केला होता. त्यानंतरच तक्रारदार यांनी नविन कनेक्शन मिळणेचा अर्ज MSEB कडे दिला. रिकनेक्शनसाठी कधीही अर्ज दिला नव्हता. शिवाय रिकनेक्शन हे पूर्वीचा वीज पुरवठा कायमपणे तोडलेनंतर सहा महिन्यातच देता येते. MSEB यांनी तक्रारदार यांना नविन कनेक्शनच दिले होते.

४) तक्रारदार यांनी वि.प. /MSEB यांची परिपत्रके क्र. ५१३ दि. १८-०३-१९९३, ५१८दिनांक १८-०६-१९९३ आणि ६०७ दि. १९-१२-१९९८ यांचा उल्लेख केला आहे. परिपत्रक क्र. ६०७ हे मा. मुंबई उच्च न्यायालय यांनी दि. १३-१२-२००२ रोजी रद्दबातल ठरविले आहे. तक्रारदार यांना त्यानंतर परिपत्रक क्र.५१८ नुसार नविन वीज जोडणी दिली होती. MSEB यांनी नविन कनेक्शनसाठीच तक्रारदारकडून एकूण रु. ३९,९२,८००/- भरुन घेतले होते. तक्रारदार यांना आता त्यांच्या वि.प. कडील अनामत रक्कमेवर व्याज मिळणेचाही हक्क आहे.

५) तक्रारदार पुढे असे नमूद करतात की, ज्या दिवशी विद्युत कायदा २००३ चा अंमल देशात सुरु झाला त्या दिवशी सर्व जुने संबंधीत कायदे, परिपत्रके वगैरे कलम १८५ प्रमाणे रद्द झालेले आहेत. जुनी परिपत्रके, नविन कायद्यानुसार कायदेशीर आहेत किंवा कसे हे ठरवणे जरुर आहे. मा. नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या परिपत्रक क्र ६०७ रद्द ठरवणेच्या निर्णयावर मा.ना. सर्वोच्च न्यायालयात वि.प. यांनी जे अपिल दाखल केले त्याबाबतची सर्व माहिती तक्रारदार यांना दिली जात नाही. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगलीकडे दिनांक १८-०६-२०१६ रोजी गाऱ्हाणे दाखल केले परंतु सदर कक्षाने "तुळशी फौड्रीज लि. यांनी हमीपत्र दिले असून मा. सर्वोच्च न्यायालयात निर्णय प्रलंबित असल्याने अनामत रक्कम परत करता येत नाही." असा आदेश दिनांक ११-०८-२०१६ रोजी केला आहे. सदर आदेश हा बेकायदेशीर आहे असे तक्रारदार म्हणतात. महावितरण यांनी वास्तविक मे. कुलकर्णी इंजि. यांचे विरुध्द स्पे. दिवाणी वाद क्र. ४६/२००४ , १४६/२००५ आणि १५१/२००५ दाखल केले होते व ते दावे मंजूर झाले आहेत ही बाब लपवून ठेवली आहे. केवळ एक प्रकरण मा. ना. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे या कारणा वरुन वि.प. तक्रारदार यांची अनामत रक्कम परत देत नाहीत. अखेर, तक्रारदार यांनी तक्रार अर्जाच्या पृष्ठ क्र.१६ यावर आपल्या मागण्या मंजूर होणेबद्दल विनंती केली आहे. त्यांनी त्यांची अनामत व जादा क्रेडीट रक्कम व्याजासह मिळणेची आणि मे. कुलकर्णी इंजि. यांची कथित थकबाकी तक्रारदारकडून वसूलीसाठी पात्र नसलेचा आदेश होणेची विनंती केली आहे. तसेच सदर प्लॉट क्र. ई-२ या ठिकाणी नविन सिंगलफेज वीज जोडणी त्वरीत देणेचा आदेश करावा अशीही मागणी केली आहे. तक्रार अर्जातील पृष्ठ क्र.१५ येथे नमूद केलेली कागदपत्रे व माहिती वि.प. यांनी उपलब्ध करावी अशीही मागणी केली आहे.

६) वि.प. - वितरण कंपनीतर्फे लेखी निवेदन मंचासमोर दाखल करणेत आले आहे. त्यांचे काय म्हणणे आहे हे या आणि पुढील परिच्छेदांमध्ये नमूद करणेत येत आहे.

तक्रारदार यांच्या नविन वीज पुरवठा मागणी अर्जास, त्यांचेकडून स्टॅम्प पेपरवर अंडरटेंकींग घेणेत येऊन दि. १८-०२-२००५रोजी नविन कनेक्शन मंजूर केले होते. तक्रारदार यांनी नविन वीज जोडणीसाठी रु. ३९,९२,८००/- इतकी रक्कम भरली होती. नामदार मुंबई उच्च न्यायालयाने वीज मंडळाचे परिपत्रक क्र. ६०७ रद्दबातल ठरवल्यामुळे वीज मंडळाच्या मुख्य कार्यालयाने मा.ना. सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असून ती प्रकरणे तेथे प्रलंबित आहेत. तक्रारदार यांनी दिलेल्या अंडरटेंकींगमध्ये वरील प्रलंबित प्रकरणांचा उल्लेख केला असल्यामुळे त्यांना ३० दिवसांत मे. कुलकर्णी इंजि. यांची थकबाकी भरावी असे कळविण्याचा प्रश्न उपस्थित होत नाही. महावितरण कंपनीने मे. कुलकर्णी इजि. यांचे विरुध्द थकबाकी वसूलीसाठी दाखल केलेले दिवाणी दावे मंजूर झाले असून दरखास्तही दाखल केल्या आहेत. परंतु अद्याप थकबाकीची वसूली झालेली नाही. तक्रारदार यांनी दिलेल्या सदर अंडरटेंकीग प्रमाणे मे. कुलकर्णी इजि. यांची थकबाकी भरणा करण्याची जबाबदारी तक्रारदार यांचेवर येते. त्यामुळे तक्रारदार यांची अनामत रक्कम रोखून धरण्यात आलेली आहे.

तसेच विद्युत कायदा २००३ चे कलम १८१ प्रमाणे MERC Conditioning supply २००५ च्या परिच्छेद १०.५ प्रमाणेही जबाबदारी तक्रारदार यांचेवर येते. सदर विषय सध्या मा.ना. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

७) वि.प. यांचे पुढे असे म्हणणे आहे की, पूर्वी मे. कुलकर्णी इंजि. यांच्या असलेल्या प्लॉटवर तक्रारदार यांचे मागणीनुसार नविन वीज जोडणी दिली होती. वास्तविक, MSEB जुन्या सदर ग्राहकाची थकबाकी असल्याने , नविन वीज जोडणी देणेस तयार नव्हती. परंतु तक्रारदार यांनी अंडरटेकींग (हमीपत्र) देऊन मे. कुलकर्णी इंजि. यांच्या थकबाकीची जबाबदारी घेतल्याने त्यांना वीज जोडणी देणेत आली. त्यातील अटी व शर्ती त्यांचेवर बंधनकारक आहेत. ग्राहकांच्या नावात जरी नंतर बदल झाला असला तरी ग्राहक क्रमांक बदलला नाही. रिट याचिका क्र.११०३५/२०१२ मधील मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जुन्या वीज ग्राहकाची थकबाकी वसूल करणेचा अधिकार वि.प. यांना आहे. तक्रारदार यांनी उल्लेख केलेला मा. सर्वोच्च न्यायालयाचा दिवाणी अपिल क्र. ६८१७/२०१० मधील निर्णय प्रस्तुत प्रकरणात लागू पडत नाही. वि.प. पुढे कथन करतात की, मे. कुलकर्णी इंजि. यांचेकडून येणे असलेली थकबाकी (तीन ग्राहक क्रमांकांची ) रु.६१,३२,०८०/- रु. २२,४८,६६२/- आणि रु. १९,९९,०६९/- अशी आहे. वि.प. यांनी शेवटी असे नमूद केले आहे की, मे. कुलकर्णी इंजि. यांचेकडून येणे असलेली थकबाकी अद्याप वसूल झाली नसून, तक्रारदार यांनी उपरोक्त दिनांक ०७-०१-२००५ चे हमीपत्र वि.प. यांना दिले आहे आणि मा. सर्वोच्च न्यायालयात प्रकरणे प्रलंबित असल्याने तक्रारदार यांची अनामत परत करता आलेली नाही. वितरण कंपनीने अखेर तक्रारदार यांची तक्रार नामंजूर करणेत यावी अशी विनंती केली आहे.

८) प्रस्तुत प्रकरणाची सुनावणी दि. २५-१०-२०१६ रोजी मंचासमोर नेमणेत आली होती. तक्रारदारतर्फे प्रतिनिधी श्री हरिभाऊ खापरे हे हजर होते. वि.प. तर्फे कार्यकारी अभियंता श्री पी.आर. पाटील हे हजर होते. ऊभय बाजूंचा सविस्तर तोंडी युक्तिवाद ऐकणेत आला. या प्रकरणातील सर्व दाखल कागदपत्रांचे वाचन करणेत आले.

९) या प्रकरणातील संपूर्ण परिस्थितीचा सखोल विचार करता या मंचाच्या निर्णयासाठी खालील मुद्दे उपस्थित होतात.

(१) तक्रारदार यांनी वि.प.कडे भरणा केलेली आणि वि.प.कडे शिल्लक असलेली रक्कम, त्यांच्यापूर्वीचे त्याच भूखंडा वरील वीज ग्राहक मे. कुलकर्णी इंजि. असोसिएटस यांच्याकडून येणे असलेल्या थकबाकीचे कारणा वरुन, सध्या तक्रारदार यांना परत देणेचा आदेश करणे योग्य होईल काय?

उत्तरः- नाही.

(२) तक्रारदार यांनी त्यांच्या गा-हाणे अर्जातीदल पृष्ठ क्र. १६ परिच्छेद -६ मध्ये मागितल्यानुसार त्यांना मालमत्तेच्या रक्षणासाठी त्यांच्या सदर भूखंडावर सिंगल फेज कनेक्शन देण्याचा आदेश करणे योग्य होइल काय?

उत्तर :- होय

(३) कोणता अंतिम आदेश?

उत्तरः- शेवटी नमूद केल्याप्रमाणे.

**कारणमिमांसा**

१०) या प्रकरणातील नमूद असलेल्या प्लॅाट क्र. ई-२, एम.आय.डी.सी. कुपवाड, सांगली या ठिकाणी पूर्वी मे. कुलकर्णी इंजिनियरिंग असोसिएट्स लि. यांचा औद्योगिक व्यवसाय चालू होता. त्यांचा विद्युत पुरवठा वितरण कंपनीने दिनांक १८-०३-२००३ रोजी अगर त्या सुमारास कायम स्वरुपी बंद केला होता. दिनांक ३१-१२-२००४ रोजी मे. कुलकर्णी असो. यांचेकडून वि.प. यांना एकूण रु. ८८,२५,४८०/- इतकी थकबाकी येणे होती. दरम्यान तक्रारदार मे. तुळशी फौंड्रीज यांनी उपरोक्त प्लॅाट (भूखंड) लिलांवामध्ये सिकॅाम कडून खरेदी केला होता. आणि दिनांक २७-१२-२००४च्या सुमारास त्यांनी नविन वीज जोडणी मिळणेबद्दल तत्कालीन MSEB कडे अर्ज केला. तसेच त्यांनी दिनांक ०७-०१-२००५ रोजी एक अंडरटेकींग (हमीपत्र) लिहून दिले होते. मे. तुळशी फौड्रीज यांना नविन वीज जोडणीची मंजूरी दिनांक १८-०२-२००५ च्या पत्रानुसार देणेत आली. तुळशी फौड्रीज यांनी जरुर ती अनामत वगैरे रक्कम ही वि.प. यांचेकडे भरणा केली. त्यानंतर वि.प. यांनी तक्रारदार यांना दिनांक २२-०३-२००५ च्या सुमारास वीज जोडणी दिली. फेब्रुवारी २०१० मध्ये वि.प. यांनी तक्रारदार यांना वाढिव विद्युत भार मंजूर केला. त्यानंतर तक्रारदार यांच्या दि. ०५-१०-२०१५ च्या अर्जातील विनंती प्रमाणे वि.प. यांनी त्यांचा वीज पुरवठा दिनांक २७-१०-२०१५ रोजी कायम स्वरुपी खंडीत केला. वरील हकीकतीबाबत उभय पक्षामध्ये वाद नाही.

११) तक्रारदार यांची विद्युत जोडणी जेव्हा वरील प्रमाणे कायमपणे बंद करण्यात आली तेव्हा त्यांच्याकडून वि.प. यांना काहीही थकबाकी येणे नव्हती. उलट त्यांच्या खात्यावर वजा (-) रु. २,०९,६२०/- रक्कम जमा होती. दिनांक २२-०१-२०१६ रोजी त्यांनी त्यांची वि.प.कडे जमा असणारी अनामत रक्कम व क्रेडीट रक्कम परत मिळणेसाठी वितरण कंपनीकडे अर्ज दिला. तथापि, दि. २४-०२-२०१६ च्या पत्राने, शिल्लक रक्कम सध्या परत देता येणार नाही असे नमूद करुन तक्रारदारांचा अर्ज फेटाळणेत आला.

१२) तत्कालीन MSEB चे परिपत्रक क्र. ५१८ दि. १८-०६-१९९३ यावर तक्रारदार विसंबून आहेत. ज्या नविन ग्राहकास फेर जोडणी (रिकनेक्शन) घ्यायचे असेल त्यांना त्यांच्या अगोंदर त्याच ठिकाणी असलेल्या वीज ग्राहकाची संपूर्ण थकबाकी (व्याज वगैरेसह) वीज मंडळाकडे भरणे आवश्यक होते आणि त्यानंतर त्यांना फेर जोडणी दिली जाईल असे परिपत्रक क्र. ५१८ मध्ये नमूद आहे. परंतु ज्या नविन ग्राहकास पूर्णतः नविनच वीज जोडणी घेणेची असेल अशा ग्राहकास त्याच जागेत त्यांच्या अगोदर व्यवसाय करीत असलेल्या ग्राहकाची थकबाकी वीज मंडळाकडे भरण्याची गरज नव्हती असे वरील परिपत्रकात नमूद केले होते. तक्रारदार याना फेरजोडणी दिलेली नव्हती. तर त्यांना नविन वीज जोडणी (ग्राहक क्र. २७९२४९००५२८०) दिलेली होती. याबद्दल वाद नाही. दिनांक ०७-०१-२००५ चे तक्रारदार यांचे हमीपत्र, त्यांना फेरजोडणी (Reconnection ) मिळणेकामी त्यांनी पूर्वीच्या ग्राहकाची म्हणजे मे. कुलकर्णी असो. यांची संपूर्ण थकबाकी भरणेबद्दल त्यानी पत्करलेली जबाबदारी या संदर्भात दिले होते.

१३) तथापि दि. १९-१२-१९९८ रोजी वीज मंडळाने परिपत्रक क्र. ६०७ प्रसिध्द करुन त्याद्वारे वर नमूद केलेले परिपत्रक क्र.५१८ हे दिनांक १९-१२-१९९८ पासून रद्द केले. परिपत्रक क्र. ६०७ मध्ये असे नमूद करण्यात आले की, नविन वीज जोडणी असो. की, फेर जोडणी असो. त्या ग्राहकाला त्यांच्या जागी त्याचे अगोदर व्यवसाय करण्या-या ग्राहकाची संपूर्ण थकबाकी भरल्यानंतर जोडणी देता येईल. म्हणजे परिपत्रक क्र.६०७ हे नविन वीज जोडणी मागणारा ग्राहक आणि फेर जोडणी मागणारा ग्राहक यामध्ये कोणताही फरक करीत नाही. या परिपत्रकात ग्राहकाकडून कोणतेही अंडरटेकिंग (हमीपत्र) घेणेत यावे असे काहीही नमूद नाही. म्हणजेच तक्रारदार यांनी जसे हमीपत्र दिनांक ०७-०१-२००५ रोजी लिहून दिले तसे एखाद्या ग्राहकाने लिहून दिले नाही तरीही त्या ग्राहकाला त्याच्या जागी त्याच्या अगोदर उद्योग व्यवसाय करणा-या ग्राहकाची सर्व थकबाकी भरल्यानंतरच नविन जोडणी किंवा फेर जोडणी देता येईल असा स्पष्ट अर्थ परिपत्रक क्र. ६०७ चा होत आहे.

१४) रिट याचिका क्र. ५१९६/२००१ सुपर अॅड स्टेनलेस लि. वि. स्टेट ऑफ महाराष्ट्र आणि रिट याचिका क्र. २९५/२००१ सिकॅाम लि. विरुध्द महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ निर्णय दि. १९-१२-२००२ यामध्ये नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने वर परिच्छेद १३ मध्ये नमूद केलेले परिपत्रक क्र. ६०७ रद्द बातल ठरविले. त्या निर्णया विरुध्द म.रा.वि.मं. किंवा सध्याची वितरण कंपनी यांनी मा. नामदार सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे याचिका पूर्वीच दाखल केल्या असून त्यामध्ये सदर याचिका तीन न्यायमूर्तींच्या पीठासमोर सुनावणीस ठेवणेबद्दल आदेश झाले आहेत. म्हणजेच, सदर परिपत्रक क्र. ६०७ हे कायदेशीर आहे किंवा कसे हा महत्वाचा प्रश्न मा. नामदार सर्वोच्च न्यायालयात अद्यापही प्रलंबित आहे.

१५) जर मा.ना. सर्वोच्च न्यायालयाने परिपत्रक क्र.६०७ हे वैध किंवा कायदेशीर आहे असे अंतिमरित्या ठरवले तर त्यापूर्वीचे परिपत्रक क्र.५१८ हे अस्तित्वातच रहात नाही आणि त्यामुळे तक्रारदार यांना परिपत्रक क्र.५१८ चा कोणताही लाभ घेता येणार नाही. केवळ, मा. सर्वोच्च न्यायालयाने मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या दि. १९.१२.२००२ च्या निर्णयास स्थगिती दिलेली नाही या एकाच कारणा वरुन परिपत्रक क्र.६०७ कायदेशीर नाही असे सध्या म्हणता येत नाही. उलटपक्षी , नामदार सर्वोच्च न्यायालयाने , परिपत्रक क्र. ६०७ च्या अनुषंगाने उपस्थित झालेला कायदेशीर मुद्दा मोठया पीठापुढे (Larger Bench) सुनावणीस नेमणेचा आदेश दिलेला आहे.

हे खरे आहे की, सिव्हील अपिल क्र. ६८१७/२०१० - हरियाणा स्टेट इलेक्ट्रीसिटी बोर्ड विरुध्द मे.हनुमान राईस मिल्स या मधील दि. २०.०८.२०१० च्या निर्णयामध्ये मा.ना. सर्वोच्च न्यायालयाच्या दोन सन्माननीय न्यायमूर्तीच्या पीठाने परिच्छेद - ८ मध्ये , पश्चिमांचल विद्युत वितरण निगम लि. विरुध्द डी.व्ही. एस. स्टीलस (२००९ (१) SCC-२१०) या निर्णयातील खालील निरीक्षण नमूद केले आहे.

“A transferee of the premises or a subsequent occupant of a premises with whom the supplier has no privity of contract cannot obviously be asked to pay the dues of his predecessor in title or possession, as the amount payable towards supply of electricity does not constitute a 'charge' on the premises. A purchaser of a premises, cannot be foisted with the electricity dues of any previous occupant, merely because he happens to be the current owner of the premises.

परंतु त्याच परिच्छेद ८ मधील मा.ना. सर्वोच्च न्यायालयाचे खालील निष्कर्ष अत्यंत महत्वाचे आहेत.

When the purchaser of a premises approaches the distributor seeking a fresh electricity connection to its premises for supply of electricity, the distributor can stipulate the terms subject to which it would supply electricity. It can stipulate as one of the conditions for supply, that the arrears due in regard to the supply of electricity made to the premises when it was in the occupation of the previous owner/occupant, should be cleared before the electricity supply is restored to the premises or a fresh connection is provided to the premises. If any statutory rules govern the conditions relating to sanction of a connection or supply of electricity, the distributor can insist upon fulfillment of the requirements of such rules and regulations. If the rules are silent, it can stipulate such terms and conditions as it deems fit and proper, to regulate its transactions and dealings. So long as such rules and regulations or the terms and conditions are not arbitrary and unreasonable, courts will not interfere with them.

A Stipulation by the distributor that the dues in regard to the electricity supplied to the premises should be cleared before electricity supply is restored or a new connection is given to a premises, cannot be termed as unreasonable or arbitrary. In the absence of such a stipulation, an unscrupulous consumer may commit defaults with impunity, and when the electricity supply is disconnected for non-payment, may sell away the property and move on to another property, thereby making it difficult, if not impossible for the distributor to recover the dues. Provisions similar to Clause ४.३ (g) and (h) of Electricity Supply Code are necessary to safeguard the interests of the distributor."

१६) वरील निष्कर्षाचा स्पष्ट अर्थ असा आहे की, विद्युत वितरण कंपनी , अगोदर त्याच ठिकाणी ऊद्योग करीत असलेल्या वीज ग्राहकाची थकबाकी नंतर येणा-या नविन ग्राहकाकडून त्यास विद्युत पुरवठा देण्यासाठी पूर्णतः भरावी लागेल अशी शर्त नविन ग्राहकास घालू शकते.अशीच शर्त या प्रकरणातील वि.प. यांनी परिपत्रक क्र.६०७ मध्ये स्पष्टपणे नमूद केलेली आहे ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. त्यामुळे परिपत्रक क्र. ६०७ याबाबतचा मा. सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय पीठाचा होणारा निर्णय या प्रकरणात महत्वाचा ठरणार आहे.

१७) सन-२०१० मध्ये मूळचे वीज ग्राहक मे. तुळशी फौंड्रीज लि. यांचे नाव बदलणेत येऊन ते मे. तुळशी कास्टींग ॲन्ड मशिनिंग लि. असे नोंद करणेत आले. परंतु ग्राहक क्रमांक मात्र बदलणेत आला नाही. मे. तुळशी फौन्ड्रीज आणि मे . तुळशी कास्टींग ॲन्ड मशिनिंग लि. या दोन स्वतंत्र आणि वेगळया संस्था आहेत असे कोणाचेही म्हणणे नाही. त्यामुळे मे. तुळशी फौन्ड्रीज लि. यांनी दिलेले दि. ०७-०१-२००५ चे स्टॅंपावरील हमीपत्र मे. तुळशी कास्टींग ॲन्ड मशिनिंग लि. यांचेवर बंधनकारक रहात नाही असे म्हणता येत नाही. तसे असते तर मे. तुळशी फौन्ड्रींज लि. यांनी वि.प. कडे भरलेली अनामत रक्कम मे. तुळशी कास्टींग ॲन्ड मशिनिंग लि. यांना मागणी करणेचा अधिकार राहिला नसता.

१८) आता, उपरोक्त दि. ०७.०१.२००५ च्या हमीपत्रात काय नमूद केले आहे ते पहाणे गरजेचे आहे. ते मे. तुळशी फौन्ड्रीज लि. यांचेसाठी श्री संजय गोपाळ बिचू यांनी म.रा.वि.मं. यांना लिहून दिले आहे. जरी हमीपत्र रिकनेक्शनसाठी लिहून दिले असले तरी परीपत्रक क्र. ६०७ प्रमाणे असे हमीपत्र रिकनेक्शनसाठी व नविन कनेक्शनसाठी चालू शकते. किंबहूना सदर परिपत्रक , अशा त-हेचे हमीपत्र ग्राहकाने लिहून दिले नसले

तरीही, लागू होऊ शकते. या हमीपत्राने असे अभिवचन मे. तुळशी फौन्ड्रीज यांनी दिले आहे, की जर MSEB मा. सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणामध्ये यशस्वी झाली , म्हणजेच वेगळया अर्थाने परिपत्रक क्र.६०७ कायदेशीर वैध असल्याचे ठरवण्यात आले, तर मे. कुलकर्णी असो. यांची संपूर्ण थकबाकी भरण्यास ते जबाबदार असतील. सदरचे हमीपत्र बेकायदेशीर अगर अवैध आहे असे किमान सध्या तरी म्हणता येणार नाही. हमीपत्रात पुढे असे नमूद केले आहे की, नामदार सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय झाल्यानंतर आणि त्याची समज तुळशी फौन्ड्रीज यांना MSEB यानी दिल्यानंतर पुढील तीस दिवसांचे आत मे. कुलकर्णी यांची सर्व थकबाकी भरण्यात येईल. या ठिकाणी , सन-२०१० मध्ये तक्रारदार यांच्या नावात झालेला बदल कोणताही विपरीत परिणाम करु शकत नाही.

१९) वितरण कंपनी यांनी मे. कुलकर्णी इंजि. असोसिएटस यांचे विरुध्द स्पेशल दिवाणी दावे क्र.१४६/२००५, १५१/२००५ आणि ४६/२००४ सांगली येथील मा.वरिष्ठस्तर दिवाणी न्यायाधीश यांच्या न्यायालयात दाखल केले होते आणि ते दावे मंजूर झाले आहेत. हे खरे आहे की, त्या दिवाणी दाव्यामध्ये यातील तक्रारदार यांना पक्षकार करणेत आले नव्हते. तथापि, केवळ त्याच कारणा वरुन आणि तक्रारदार यांनी सदरचे हमीपत्र दिले असल्याने त्यांना आताच जबाबदारीमुक्त करता येणार नाही.

२०) सुनावणीचे दरम्यान असेही सुचित करण्यात आले आहे की, नामदार मुंबई उच्च न्यायालयाच्या दि. १९.१२.२००२ च्या निर्णयाच्या आधारे वितरण कंपनीने तक्रारदार यांची रक्कम परत करणेचा आदेश व्हावा, आणि यदाकदाचित भविष्यात तक्रारदार यांची मे. कुलकर्णी यांची थकबाकी भरण्याची जबाबदारी येते असे अंतिमरित्या ठरले तर त्या प्रसंगी ती थकबाकी तक्रारदार यांचेकडून वितरण कंपनीने वसूल करुन घ्यावी. परंतु असा आदेश करणे सर्वथा योग्य होणार नाही. भविष्यकाळात थकबाकीची रक्कम वसूल करुन घेणे वितरण कंपनीस अत्यंत कठीण होण्याचीच शक्यता जास्त आहे.

२१) तक्रारदार यांचेतर्फे असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, नियमानुसार तत्कालीन MSEB यांची परिपत्रके, विशेषतः परिपत्रक क्र. ६०७ यामध्ये विनियमाच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून चार महिन्यात बदल किंवा अद्ययावत केल्याचा पुरावा नसल्याने त्या मुदतीनंतर अवैध समजणेची आहेत. परंतु या युक्तिवादात काहीही तथ्य दिसत नाही. परिपत्रक क्र. ६०७ च्या वैधतेचा प्रश्न व त्या अनुषंगाने इतर संबंधीत बाबी नामदार सर्वोच्च न्यायालयापुढे निर्णयासाठी प्रलंबित असताना या मंचाने सध्या त्या परिपत्रकावर भाष्य किंवा टिप्पणी करणे संयुक्तिक ठरत नाही.

तसेच तक्रारदार यांच्या नावात सन-२०१० मध्ये बदल केला जाताना नविन करार करण्यात आला किंवा नाही हा मुद्दा या प्रकरणात महत्वाचा ठरत नाही. नविन करार केला किंवा केला नाही. या वरुन परिपत्रक क्र. ६०७ यावर परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे नियम क्र. १०.५ याचाही सध्या विचार करणेची आवश्यकता नाही.

मा. नामदार सर्वोच्च न्यायालयात वरील प्रमाणे प्रकरणे प्रलंबित असल्यामुळे , मा.ना मुंबई उच्च न्यायालयाच्या रिट याचिका क्र. ११०३५ /२०१२ यशोधन कमलाकर सावंत विरुध्द म.रा.वि.वि.कं. मर्यादित या मधील दिनांक १९-०८-२०१३ च्या निर्णयाचा वि.प. यांना आधार घेता येणार नाही.

२२) सन-२०१० मध्ये तक्रारदार यांच्या नावामध्ये बदल करताना जरी कोणतेही नवे हमीपत्र त्यांचेकडून वि.पं. यांनी लिहून घेतले नसले. तरी त्याचा काहीही परिणाम या प्रकरणावर होत नाही. वास्तविक असे कोणतेही नविन हमीपत्र तक्रारदारकडून घेण्याची कायद्याने गरज नव्हती. परिपत्रक क्र.६०७ मध्ये असे कोणतेही हमीपत्र ग्राहकाकडून लिहून घेणेबाबत कसलाही उल्लेख नाही. परिपत्रक क्र.६०७ वैध ठरल्यास हमीपत्र नसले तरी जुन्या ग्राहकाची थकबाकी पुढील ग्राहकाकडून वसूल करता येईल असे या अध्यक्षांचे स्पष्ट मत आहे. त्याचप्रमाणे , या प्रकरणात तक्रारदार यांचेतर्फे दिनांक ०७-०१-२००५ रोजी वि.प. यांना हमीपत्र दिले असल्याने विद्युत कायदा कलम ५६(२) या बाबतचा विचार करणेची गरज नाही.

२३) मा. नामदार सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या उपरोक्त प्रकरणांमध्ये प्रस्तुत तक्रारदार अगर/आणि मे. कुलकर्णी इंजि. असोसिएटस हे पक्षकार नाहीत हे खरे आहे. तरीही मा.ना. सर्वोच्च न्यायालया परिपत्रक क्र. ६०७ च्या वैधतेबाबत जो काही अंतिम निर्णय जाहिर करेल तो भारतीय राज्यघटनेतील तरतूदीनुसार सर्व न्यायासनांवर बंधनकारक रहातो हे ध्यानात ठेवणे गरजेचे आहे.

२४) वर नमूद केलेल्या सर्व कारणास्तव तक्रारदार यांची वि.प.कडे जमा व शिल्लक असलेल्या रकमा परत मिळणेची मागणी मा. सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यन्त तूर्त तरी मान्य करता येत नाही. मा.ना. सर्वोच्च न्यायालयाचा उपरोक्त प्रकरणात अंतिम निर्णय जाहिर झाल्यानंतर तक्रारदार यांना पुन्हा गा-हाणे अर्ज दाखल करणेची मुभा देणेत येत आहे.

२५) तथापि, तक्रारदार यांच्या भूखंड क्र.ई-२ एमआयडीसी कुपवाड यावर असलेल्या मालमत्तेच्या रक्षणासाठी त्यांना नियमानुसार नविन सिंगल फेज वीज जोडणी देण्याचा आदेश करणे योग्य होईल.

वर नमूद केलेल्या सविस्तर कारणास्तव प्रस्तुतचा तक्रार अर्ज केवळ अंशतः मंजूर करणे क्रमप्राप्त आहे. तक्रारदार यांची मुख्य विनंती सध्या तरी मंजूर करता येणार नाही. सबब,खालील प्रमाणे अंतिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१) तक्रार अर्ज अंशतः खालील प्रमाणे मंजूर करणेत येतो.

२) तक्रारदार यांना त्यांचेकडील प्लॅाट क्र.ई-२ एम.आय.डी.सी. कुपवाड (सांगली) वरील यंत्रसामुग्री व इतर मालमत्तेच्या रक्षणासाठी नियमानुयार ,नविन सिंगल फेज वीज जोडणी एक महिन्यात वि.प. यांनी द्यावी.

३) तक्रारदार यांची वि.प. वितरण कंपनी यांचेकडे जमा असलेली अनामत वगैरे रक्कम परत मिळणेबद्दलची त्यांची मागणी तूर्त म्हणजे या न्याय निर्णयात उल्लेख केलेल्या प्रलंबित असलेल्या प्रकरणांमध्ये होणा-या मा. नामदार सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णया पर्यन्त अमान्य करणेत येत

आहे.नामदार सर्वोच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर जरुर तर तक्रारदार यांना सदर रक्कम परत मिळणेबद्दल योग्य तो गा-हाणे अर्ज दाखल करण्याची मुभा देणेत येते .

४) वरील प्रमाणे प्रस्तुत प्रकरण सध्या निकाली काढण्यात येत आहे.

५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

६) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (श्री प्र. स. बुरांडे) | (प्र.वि. खपली) | (वि. श. गुळवणी) |
| ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |